दै. गोदातीर दि. 05-01.25

# मटका बुक्कीवर भाग्यनगर पोलिसांची कारवाई; चार जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कल्याणनगर पाटीजवळ सुरू असलेल्या एका मटका बुक्कीवर पोलिसांनी कारवाई करून चार जणांना अटक केली. त्यांच्याकडून मटका जुगाराचे साहित्य व नगदी दोन हजार रुपये जप्त केले आहेत. ही कारवाई ३ जानेवारी रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांनी आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे चालणार नाहीत यासाठी खबरदारी घेतली असून, आपल्या पथकासह ते सतत गस्त घालत असतात. परंतु कल्याणनगर पाटीजवळ राज कॉर्नर येथे पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकत मटकाबुक्की सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार राजकुमार डोंगरे यांना समजली. त्यांनी त्या ठिकाणी कारवाई करून राजानंद गणपत नरवाडे (वय ४६), राहुल अर्जुनराव कदम (वय ४०), अनिकेत रमेश कांबळे (वय २३) आणि वेणू कांबळे राहणार राज कार्नर कल्याणनगर यांना अटक केली. त्यांच्याकडून मटका जुगाराचे साहित्य आणि रोख दोन हजार ४० रुपये जप्त करण्यात आले. पोलीस अंमलदार राजकुमार डोंगरे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात वरील चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार हंबर्डे करत आहेत.